# मानस सरोवर



स्थिर करतं माझं मन
सरोवरातील नीर

त्याच्या समांतर पातळीवर
शांतपणं पहुडावं
जवळीच्या ओलाव्यात
किना-याचं तृण व्हावं

आभाळाचं पाण्यातलं
प्रतिबिंब हलवावं
ओंजळीनं पाणी पिता
आंत ओलचिंब व्हावं

अमृताचा स्पर्श घेता
तरंगाना जागवावं
निर्मियिल्या लहरीच्या
वलयात लीन व्हावं

भ्रमराच्या गुंजारवी
अंतरंग खुलवावं
कमलानं विकलता
मिलनाचा रंग व्हावं

किना-याच्या निथळीत
क्षितिजाला सामावावं
स्थिर मानस सरोवरी
नीर गारव्याचं व्हावं